**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**शुक्रवार दिनांक : १५, नोव्हेंबर, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **नागपूर-मुंबई समृद्धी मार्ग यवतमाळ जिल्हयातील उमरखेड पर्यंत जोडला जाणार - भाजप नेते आणि केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांची यवतमाळच्या प्रचार सभेत घोषणा.**

2. **जातनिहाय जनगणनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या पक्षाची भूमिका स्पष्ट करण्याची काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांची मागणी.**

3. **प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत मराठी भाषा अनिवार्य करण्याची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आज प्रसिद्ध जाहीरनाम्यातून भूमिका.**

4. **शिख धर्माचे संस्थापक गुरु नानक देवजी आणि आदिवासी जननायक क्रांतीवीर बिरसा मुंडा यांची जयंती सर्वत्र साजरी.**

---

**अमित शहा**

वर्धा-नांदेड रेल्वे योजना पाच वर्षात पूर्ण करणार, याशिवाय नदी जोड प्रकल्पामध्ये पैनगंगा नदीचा समावेश करून सिंचन व्यवस्था वाढवणार, तसंच नागपूर-मुंबई समृद्धी मार्ग यवतमाळ जिल्हयातील उमरखेड पर्यंत जोडला जाणार अशा घोषणा केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी आज यवतमाळ मध्ये आयोजित प्रचार सभेत केल्या. यवतमाळ जिल्हयातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते.

दरम्यान त्यांनी या सभेत काँग्रेस नेते राहुल गांधी आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. काँग्रेस पक्षाने गेली 70 वर्ष विविध विकास प्रकल्प अडवून ठेवले तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाने औरंगाबादचे नाव संभाजीनगर करण्यास विरोध केला असा आरोप त्यांनी केला. वक्फ कायद्यांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा पुनरुच्चार देखील त्यांनी यावेळी केला.

त्यानंतर ४ वाजता झालेल्या चंद्रपूरच्या सभेत - विकासासाठी मोदीजींचे हात मजबूत व्हावे म्हणून महायुतीला मतदान करण्याचं अमित शहा यांनी उपस्थितांना आवाहन केलं.

महायुती सरकारच्या काळात 15 लाख कोटींचा निधी महाराष्ट्राच्या विकासासाठी दिला असल्याचं देखील त्यांनी यावेळी सांगितलं.

---------------------------------------------------

**मोदी सभा/काँग्रेस पत्रकार परिषद**

काँग्रेस आणि महाविकास आघाडी सत्तेत आली तर आरक्षण हटवेल, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मुंबईत शिवाजी पार्कवर घेतलेल्या सभेत केला. अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी यांची एकजूट तोडण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. हे लोक आपापसात लढले तर काँग्रेस मजबूत होईल, असा दावा त्यांनी या सभेत केला.

दरम्यान काँग्रेस अनुसूचित जाती आणि जमातींचे आरक्षण संपवणार असल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदींचा आरोप जनतेची दिशाभूल करणारा आहे. काँग्रेस पक्षानेच देशाला संविधान आणि आरक्षण देऊन मागास जातींना हक्क व अधिकार दिले असं मत काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी आज मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केलं .

राहुल गांधी यांनी ४ हजार किलोमीटरची पदयात्रा काढली आणि जातनिहाय जनगणनेची मागणी केली आहे. जातनिहाय जनगणनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या पक्षाची भूमिका काय आहे हे त्यांनी स्पष्ट करावं अशी मागणी चेन्नीथला यांनी यावेळी केली. भारतीय जनता पक्षाने शेतकऱ्यांची फसवणूक केली असून देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कांदा आणि कापसाला योग्य भाव देण्याचे आश्वासन पाळले नाही. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर सोयाबीनला ७००० रुपये प्रति क्विंटल भाव देऊ असही त्यांनी जाहिर केलं.

---------------------------------------------------

**मनसे जाहीरनामा**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाचा जाहीरनामा आज मुंबईत प्रसिद्ध केला. गेल्या १९ वर्षात आम्ही काय केलं यावरची पुस्तिकाही त्यांनी आज प्रसिद्ध केली. गडकिल्ल्यांचे संवर्धन करणे गरजेचे असून शिवरायांच्या मंदिरापेक्षा विद्या मंदिर बांधणे महत्वाचे आहे, असं राज ठाकरे यांनी यावेळी स्पष्ट केलं. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत मराठी भाषा अनिवार्य असायला हवी, अशी भूमिका त्यांनी या जाहीरनाम्यात मांडली आहे. येत्या १७ नोव्हेंबरला शिवाजी पार्क मैदानावर मनसेच्या सभेसाठी अद्याप परवानगी मिळालेली नाही. वेळ अपुरा असल्याने ही सभा न घेता मतदार संघांना भेटी देण्यात येतील, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

---------------------------------------------------

**आजच्या प्रचारसभा**

विधानसभा निवडणूक मतदानाची वेळ जसजशी जवळ येत आहे तसतशी सर्वत्र रोज प्रचार सभांचा वेग वाढला आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यातील अहेरी विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार **धर्मरावबाबा आत्राम** आणि गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे उमेदवार **डॉ.मिलिंद नरोटे** यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेला आज केंद्रीय मंत्री आणि ज्येष्ठ भाजपा नेते नीतिन गडकरी यांनी संबोधित केलं. आम्ही घटना बदलणार नाही आणि कोणाला ती बदलूही देणार नाही, अस गडकरी यावेळी म्हणाले.

**गोंदिया** विधानसभा क्षेत्राचे महाविकास आघाडीचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांच्या प्रचारासाठी काँग्रेस नेते **कन्हैया कुमार** यांनी गोंदियात प्रचार सभा घेत गोपालदास अग्रवाल याना निवडून देण्याचं आवाहन केलं. दरम्यान गोंदिया विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार आमदार **विनोद अग्रवाल** देखील गोंदिया विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक गावा गावात जाऊन मतदारांच्या भेटी घेत असल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे.

जात-पात, धर्म, वर्ग यांचा विचार न करता फक्त विकासाच्या मुद्द्यावर मतदान करावं. भाजपचे सर्व उमेदवार जनतेच्या अपेक्षांवर पुरेपूर उतरतील आणि जीवनमानात सुधारणा घडवून आणतील असा विश्वास व्यक्त करताना मतदाराचे एक मत नागपूर शहराच्या विकासाचे बळ ठरणार असल्याचं प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष **चंद्रशेखर बावनकुळे** यांनी केलं. त्यांनी काल नागपूर शहरातील पूर्व, दक्षिण, दक्षिण -पश्चिम, पश्चिम आणि मध्य विधानसभा क्षेत्रात प्रचार केला.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची आज नागपुरातील म्हाळगी नगर चौक इथं संध्याकाळी सव्वा सात वाजता सभा होणार असून तत्पूर्वी संध्याकाळी सहा वाजता मौदा इथं तर बांगलादेश इथं सव्वा आठ आणि भांडेवाडी इथं रात्री सव्वानऊ वाजता महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा होणार आहे. तर गणेश चौक वैशाली नगर दिग्दोह इथं आपचे खासदार संजय सिंग आज प्रचारसभा घेणार आहे.

---------------------------------------------

**मतदान जनजागृती**

मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे, तरी देखील नागरिक मतदानासाठी उदासीन दिसून येतात, अशा नागरिकांना मतदानासंदर्भात जागृत करण्यासाठी नागपूर महानगरपलिकेच्या वतीने स्वीप कार्यक्रमांतर्गत येत्या रविवारी 17 नोव्हेंबर रोजी सकाळी 9.30 वाजता मतदान जनजागृती “बाईक रॅली” चं आयोजन केलं आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येत बाईक रॅलीत

सहभाग नोंदवित मतदानाचा जागर करावा असं आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे भंडाऱ्यात आज मतदार जनजागृतीसाठी रॅली झाली. नव-मतदारांनी स्वतः मतदान करत कुटुंबातल्या इतर सदस्यांनाही मतदानासाठी प्रवृत्त करावं, मतदानाच्या दिवशी अधिकाधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन जिल्हाधिकारी संजय कोलते यांनी केलं.

चंद्रपूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने देखील आज मिनी मॅरेथॉन 'रन फॉर व्होट' चं आयोजन करण्यात आलं होतं. या मॅरेथॉनमध्ये विद्यार्थी, तरुण- तरुणी आणि नागरिकांनी सहभागी होऊन मतदार जनजागृतीचा संदेश दिला.

----------------------------------------------

**गुरुनानक जयंती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुरु नानक जयंतीनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु नानक यांनी आपल्याला कठोर परिश्रमावर आधारित अध्यात्माचा मार्ग दाखवला, तसंच सत्य, समाधान, दया आणि प्रेमावर आधारित समाज कसा निर्माण करायचा हे शिकवलं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

गुरु नानक जयंतीनिमित्त नांदेडच्या सचखंड गुरुद्वारासह विविध गुरुद्वाऱ्यांमध्ये भजन, कीर्तन इत्यादी धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. आज कार्तिकी पौर्णिमा देखील आहे; त्यामुळे राज्यात ठिकठिकाणी दीपोत्सवाचं आयोजन केलं आहे.

शिख धर्माचे संस्थापक गुरु नानक देवजी यांची 555 वी जयंती आज बुलढाणा शहरातील जांभरुन रोडवरील गुरुद्वारामध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. या दरम्यान प्रभातफेरी, रक्तदान आणि वाहे गुरुजींचा जाप करत लंगर प्रसादने, सांगता करण्यात आली.

----------------------------------------------

**आदिवासी जनजाती दिवस**

देशाच्या परंपरेत आदिवासी समुहाचं योगदान महत्वाचं असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. आदिवासी समाजाचं नेतृत्व केलेल्या भगवान बिरसा मुंडा यांची जयंती, आज आदिवासी गौरव दिन म्हणून साजरी होत असून, या दिनाच्या पूर्वसंध्येला काल राष्ट्रपतींनी देशाला संबोधित केलं.

आदिवासी जननायक क्रांतीवीर बिरसा मुंडा यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात जयंतीदिनी अभिवादन करण्यात आले.

---------------------------------------------------

**‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’**

विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या You tube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज सातारा जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

---------------------------------------------------

**हवामान**

विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये थंडीची चाहूल जाणवू लागली आहे. गोंदिया जिल्ह्यामध्ये 14. 6 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद गेल्या 24 तासात करण्यात आली आहे. गोंदियाच्या पाठोपाठ गडचिरोली इथं 15 अंश सेल्सिअस तर चंद्रपूर इथं 15. 4 आणि नागपूर इथं १५. ७ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये किमान तापमान 16 ते १८ अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

---------------------------------------------------